महाराष्ट्र पोलीस
मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर
जुना मुंबई पुणे रोड, आनंद कोळीवाडा मुंब्रा, ठाणे
पिन ४००६१२ दुरध्वनी क्रमांक ०२२-२५४६२३५५
e-mail.cp.thane.mumbra@mahapolice.gov.in



मुंब्रा पोलीस स्टेशन एन.डी.पी.एस पथकाची अंमली पदार्थविरोधात प्रभावी कारवाई

अंमली पदार्थ विक्री करणा-या ०३ नायजेरीयन नागरिकांना अटक

एकुण रू.१०,९३,०८,७००/- (दहा करोड त्रेन्नव लाख आठ हजार सातशे रुपये किंमतीचा) ०२ किलो १५७.५ ग्रॅम कोकेन व १०४.७ ग्रॅम मेफेड्रॉन (एम.डी) असे अंमली पदार्थ जप्त.

----------oooooooo----------

मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहरचे हद्दीत मुंब्रा व दिवा परिसरात अंमली पदार्थाची विक्री व सेवन करणा-या तसेच अवैध वास्तव्य करणा-या व अंमली पदार्थ विक्री करणा-या इसमांविरोधात कठोर कारवाई करणेबाबत मा.पो.आयुक्त सो,मा.पो.उप आयुक्त सो, यांनी आदेश दिले होते. त्याप्रमाणे वपोनि/श्री.गणेश जवादवाड सो, यांनी मुंब्रा, दिवा बेतवडे भागातील मॅरेथॉन प्रोजेक्ट मधील बिल्डींगमध्ये सर्च ऑपरेशन करणेस सांगितले होते. त्याअनुषंगाने मुंब्रा पोलीस स्टेशन, एन.डी.पी.एस. पथकास मॅरेथॉन नेक्सवर्ड, बेतवडे गांव, दिवा याठिकाणी काही नायजेरियन नागरिक राहत असुन ते अंमली पदार्थाची विक्री करीत असल्याची गुप्त माहिती मिळाल्याने मा. वरिष्ठांच्या आदेशाने नमुद ठिकाणी मुंब्रा पोलीस स्टेशन एन.डी.पी. एस पथकाने अधिक माहिती घेवुन मॅरेथॉन नेक्सवर्ड सोसायटीमध्ये सर्च ऑपरेशन राबविले.

सदर सर्च ऑपरेशन दरम्यान नमुद सोसायटीचे इमारतींमधील एकुण ६०० फ्लॅटस् सर्च करीत असताना पथकाने योग्य नियोजनबद्ध प्लॅनिंग करून सदर सोसायटीचे ऑरा इमारतीमध्ये राहत असलेले परदेशी नायजेरियन नागरिक **१) चुकवुएमेका इमॅन्युएल न्वांक्वो, वय ४१ वर्षे,(MR. EMMANUEL CHUKWUEMEKA NWANKWO)** (मुळ राह.नायजेरिया देश) **महिला नामे २) युकेरिया चुकवुएमेका ओबियानुजु, वय ४१ वर्षे (MRS. EUCHARIA CHUKWUEMEKA OBIANUJU)** (मुळ राह.नायजेरिया देश) यांचे राहते त्यांचे कब्ज्यात मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम करणारा एकुण **०२ किलो ९८.५ ग्रॅम वजनाचा कोकेन** व एकुण **१०४.७ ग्रॅम मेफेड्रॉन (एम डी)** हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बेकायदेशिररित्या स्वत:चे राहते घरी कब्जात बाळगला असताना मिळुन आल्याने त्यांचेविरोधात **दि.१४/११/२०२६** रोजी **गु.र.क्र. ॥ २०५३/२०२६**,एन.डी.पी.एस ॲक्ट कलम ८(क), २२(क), २९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवुन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

नमुद गुन्हयाच्या तपासादरम्यान अटक आरोपी याने सदरचा अंमली पदार्थ त्याचा साथीदार नामे **उस्मान बुआरी अली (OSMAN BUARI ALI) मुळ रा. सेनेगल पुर्व आफ्रिका** याचेसोबत मिळुन खरेदी-विक्री करीत असल्याची माहिती दिल्याने त्याअनुषंगाने लागलीच तपासाची चक्रे फिरवुन नमुद इसमाचा शोध घेवुन त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपीच्या अंगझडतीदरम्यान आरोपीच्या ताब्यातुन **५९ ग्रॅम वजनाचा कोकेन** हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयातील तीनही अटक आरोपी यांचे कब्जातुन अदयापपावेतो ०२ किलो १५७.५ ग्रॅम वजनाचा कोकेन व १०४.७ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एम डी) हा अंमली पदार्थ तसेच इतर वस्तु असा एकुण रू.१०,९३,०८,७००/- (दहा करोड त्रेन्नव लाख आठ हजार सातशे रुपये किंमतीचा) मुद्देमाल नमुद गुन्हयात जप्त करण्यात आलेला असुन तीनही अटक आरोपींना मा.न्यायालयाने दि.१८/११/२०२६ पावेतो पोलीस कोठडी रिमांड दिले आहे.

Scanned with OKEN Scanner

नमुद अटक आरोपी नामे चुकवुएमेका इमॅन्युएल न्वांक्वो (MR. EMMANUEL CHUKWUEMEKA NWANKWO) व उस्मान बुआरी अली (OSMAN BUARI ALI) यांचेवर यापुर्वी देखील एन.डी.पी.एस कायदयांतंर्गत अनुक्रमे मुंबई व नवी मुंबई येथे गुन्हा नोंद असल्याची माहिती तपासादरम्यान प्राप्त असुन आरोपी सराईत गुन्हेगार आहे.

नमुद गुन्हयातील अटक आरोपी यांचेवर भारतामध्ये दाखल असलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने तसेच अटक आरोपींचे पासपोर्ट तसेच भारतामधील वैध्य वास्तव्याबाबत तपास चालु आहे. तसेच मुंब्रा पोलीस स्टेशन हद्दीत मुंब्रा व दिवा परिसरात अशाप्रकारे अवैध वास्तव करणा-या परदेशी नागरिकांविरोधात कडक कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

मुंब्रा एन.डी.पी.एस पथकामार्फत सन-२०२६ मध्ये अंमली पदार्थांची विक्री करणा-या **४२ आरोपींविरोधात (०७ परदेशी नागरिक)** गुन्हे नोंद करण्यात आले असुन आरोपी यांचे ताब्यातुन सुमारे **४३ करोड किंमतीचा अंमली पदार्थ मुद्देमाल** जप्त करण्यात आला आहे. तसेच मुंब्रा पोलीस स्टेशन हद्दीत मुंब्रा व दिवा परिसरातील विविध भागात सोसायटीच्या आवारात, रिक्षामध्ये, निर्जण स्थळी,रिक्षा पार्किंगमध्ये, बायपास रोडवर, मोकळे मैदानात तसेच विविध ठिकाणी गांजा तसेच इतर तत्सम अंमली पदार्थांचे सेवन करणा-या ६८७ इसमांवर कारवाई करण्यात आली असुन त्यांचेविरोधात एन.डी.पी.एस कायदयांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच पथकामार्फत सिगारेट व तंबाखुजन्य पदार्थ सेवन करणा-या ९८० इसमांविरोधातदेखील कारवाई करण्यात आली आहे.

नमुद कारवाई मा.पोलिस आयुक्त ठाणे शहर श्री. आशुतोष डुंबरे, मा.पोलिस सह आयुक्त श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, मा.अप्पर पोलिस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग श्री.अशोक दुधे, मा.पोलिस उप आयुक्त परिमंडळ-०१ श्री.बाळासाहेब पाटील,सहा.पोलिस आयुक्त सो, कळवा विभाग श्री.संकेत देवळेकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री.गणेश जवादवाड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. शरद कुंभार पोलीस निरीक्षक(प्रशासन), पोनि/ अनिल गायकवाड, श्री. प्रशांत पाटील पोलीस निरीक्षक(गुन्हे), श्रीमती. वृषाली पवार पोलीस निरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), सपोनि/सचिन ढगे, सपोनि/शिवाजी हुलगे, पोउपनि/रामकृष्ण दळवी, पोहवा/३७३५ राजाराम शेगर, पोशि/२५७१ सागर महांगडे, पोशि/३१३० रोशन कदम, पोशि/७७२५ नवनाथ थोरवे, पोशि/७६५५ सचिन पाटील, पोशि/ ३२८८ किशोर माने, पोशि/८२५८ नवनाथ तेलंगे, पोशि/४२२३ नारायण गंगावणे, पोशि/३९३५ रविंन्द्र सातपुते, पोहवा/५६ रांजणे, पोहवा/१४८७ सत्रे, पोना/२५७२ सत्रे, पोशि/११४५ मुंढे, पोशि/५९७४ सपकाळे, पोशि/४६३ धुमाळ, पोशि/२०३४ सपकाळे, पोशि/४८२५ सातपुते, मपोशि/२२१२२ पांडे व मपोशि/२२११६ भालेकर यांनी केलेली आहे.

:: आवाहन ::

मुंब्रा पोलीस स्टेशन च्या वतीने मुंब्रा व दिवा येथील सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, अंमली पदार्थाचे सहमुळ उच्चाटन करण्यासाठी आपल्या परिसरामध्ये कोणीही कोणत्याही प्रकारचे अंमली पदार्थ विक्री अथवा सेवन करत असेल तसेच आपले परिसरात अवैधरित्या परदेशी नागरिक वास्तव्यास असल्यास त्याची माहिती मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री.गणेश जवादवाड व एन.डी.पी.एस पथकाचे सपोनि/सचिन ढगे मो.क्र.८१०८४८४००० व पोउपनि/रामकृष्ण दळवी मो.नं. ९६५७१२५९९० यांना गोपनीय माहिती देउन मुंब्रा पोलीस स्टेशन ला सहकार्य करावे ही विनंती.

Scanned with OKEN Scanner